# धर्मवीर संभाजी अर्बन को-ऑप. बँक लि. पिंपरी चिंचवड

**मुख्य कार्यालय : ३९१, दि. गेलांगे, मुंबई पुणे रस्ता, फुगेवाडी, पुणे ४११०१२**

## २७ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना

## (केवळ सभासदांसाठी)

धर्मवीर संभाजी अर्बन को-ऑप. बँक लि., पिंपरी चिंचवड या बँकेची २७ वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दि. २८.०९.२०२५ रोजी सकाळी १०.०० वाजता एसकेएफ युनियन सभागृह, चिंचवड टेल्को समोर, गावडे कॉलनी, चिंचवड, पुणे ३३ येथे बँकेचे अध्यक्ष श्री. बाबुराव विठ्ठलराव शितोळे यांच्या अध्यक्षतेखाली खालील विषयांचा विचार करण्यासाठी आयोजित करण्यात आली आहे. तरी सदर सभेस आपण वेळेवर उपस्थित राहावे ही विनंती.

### सभेपुढील विषय

१. मागील दि.२२.०९.२०२४ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे वृत्तांत वाचून कायम करणे.
२. सन २०२४-२५ अखेरच्या मा. संचालक मंडळाने तयार केलेल्या वार्षिक अहवालावर विचार करणे व त्यास मंजूरी देणे.
३. दि. ३१ मार्च २०२५ अखेरचा ताळेबंद व दि.०१.०४.२०२४ ते ३१.०३.२०२५ अखेरचा नफा तोटा पत्रक स्विकृत करणे.
४. सन २०२४-२५ चे वैधानिक लेखापरिक्षण अहवालाची नोंद घेणे व सन २०२३-२४ चे वैधानिक लेखापरिक्षण दोष -दुरूस्ती अहवालाची नोंद घेणे.
५. सन २०२४-२५ च्या अंदाजपत्रकापेक्षा जादा झालेल्या खर्चास मंजुरी देणे व सन २०२५-२६ वर्षाकरीता संचालक मंडळाने सादर केलेल्या अंदाजपत्रकाची माहिती घेणे व त्यास मंजुरी देणे.
६. सन २०२५-२६ या वर्षासाठी वैधानीक लेखापरिक्षक यांचे केलेल्या नियुक्तिस मान्यता देणे.
७. सन २०२५-२६ वर्षाकरीता अंतर्गत लेखापरिक्षकाची नेमणुक करण्याबाबत संचालक मंडळास अधिकार देणे.
८. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७५ (२) नुसार संचालक मंडळ सदस्य व त्यांचे नातेवाईकांना दिलेल्या कर्जाबाबत माहिती घेणे.
९. सन २०२४-२५ या वर्षात शासनाचे एकरकमी कर्ज परतफेड योजने अंतर्गत तडजोड केलेल्या कर्जाची माहिती घेणे व त्यास मान्यता देणे.
१०. मयत / पिडीत कर्जदाराचे १००% तरतूद असलेल्या संशयित व बुडीत वर्गवारीतील कर्जखात्याच्या वसुलीचा हक्क अबाधित ठेवून कर्जे निर्लेखित करण्यास मान्यता देणे.
११. वार्षिक सर्वसाधारण सभेस अनुपस्थितीत असलेल्या सभासदांच्या रजेस मान्यता देणे.
१२. मा. अध्यक्षांच्या परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयांवर चर्चा करणे.

**मा. संचालक मंडळाच्या आज्ञेवरून**

**दिनांक : १२ सप्टेंबर २०२५, पुणे.**

**गजानन श्रीधर कुलकर्णी**

**मुख्य कार्यकारी अधिकारी**

### सूचना

१. वार्षिक सर्वसाधारण सभा ठीक सकाळी १०.०० वाजता सुरू होईल परंतु गणसंख्येच्या अभावी सभा तहकूब झाल्यास, सदर वार्षिक सर्वसाधारण सभा त्याच दिवशी त्याच ठिकाणी सकाळी १०.३० वाजता घेण्यात येईल व त्या सभेस गणसंख्या नसली तरी वरील विषयांचे कामकाज होईल.
२. सन २०२४-२५ चा ताळेबंद व नफातोटा पत्रक, वार्षिक अहवाल बँकेच्या वेबसाईट www.sambhajibank.com वर प्रसिध्द करण्यात आला आहे.
३. ३१ मार्च २०२५ चा ताळेबंद, सन २०२४-२५ चे नफा-तोटा पत्रक व वैधानीक लेखापरिक्षक यांचा सन २०२४ २५ च्या वार्षिक अहवालाची प्रत बँकेच्या मुख्यकार्यालयात १५ सप्टेंबर २०२५ पासून कार्यालयीन वेळेत उपलब्ध राहील .
४. सभेच्या वेळी विषयपत्रिकेतील विषयासंबधी काही प्रश्न अथवा माहीती विचारवयाची असल्यास दि. २२ सप्टेंबर २०२५ पर्यंत मुख्यकार्यालयामध्ये कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत लेखी स्वरूपात कळविल्यास त्याप्रमाणे माहिती तयार ठेवणे साईस्कर होईल.
५. बँकेच्या सर्व सभासदांना कळविण्यात येते की, ज्या सभासदांचे पत्ता, मोबाईल नंबर बदलेले असतील व ज्या सभासदांनी केवायसीचे कागदपत्र दिलेली नसतील त्यांनी नजीकच्या शाखेत अथवा मुख्यकार्यालयातील शेअर्स विभागात देण्याची व्यवस्था करावी ही विनंती.